**नि.११२ च्या पुढे सुरु**

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेते की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

**प्रतिवादी क्र.१ सुमन दत्तात्रय बाणखेले यांचा उलटपास वादी तर्फे वकील श्री. बी. जी. काळे यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

१६. हे म्हणणे खरे आहे की, माझा विवाह वादी सोबत सन १९५९ साली गाव मौजे गिरवली येथे झाला. हे म्हणणे खरे नाही की, मी लग्नानंतर वादीसोबत थोडे दिवस मंचर येथे राहिले. हे म्हणणे खरे आहे की, लग्नानंतर मी वादीसोबत मुंबई येथे धोबी तलाव, कोलीवाडा, सायन येथे राहण्यास होते. हे म्हणणे खरे आहे की, मुंबई येथे असतांना मला मुलबाळ झाले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला मुळबाळ होत नसल्याने आम्ही दवाखान्यात गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही डॉक्टरांकडे गेलो होतो व डॉक्टरांनी मी मुल जन्माला घालण्यास सक्षम आहे असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, सन १९६१ मध्ये डॉक्टरांनी वादी दत्तात्रय बाणखेले यांच्या शरीरामध्ये शुक्राणु कमी असल्याने त्यांच्यापासुन कोणतीही उत्पत्ती होणार नाही असे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, सन १९६१ नंतर मी वादीसोबत पती पत्नी संबंध ठेवण्यास टाळत होते. हे म्हणणे खरे आहे की, सन १९६२ मध्ये माझ्या सख्ख्या भावाची पत्नी वारली. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी माझ्या आई वडीलांना करुन घालण्यासाठी गावी राहण्यास गेले.

१७. हे म्हणणे खरे आहे की, वादीने मी माहेरुन पैसे आणावे म्हणुन माझा शारीरीक छळ केला होता. हे म्हणणे खरे आहे की, शारीरीक छळाच्या आरोपाबाबत माझ्याकडे कोणताही लेखी पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी हे व्यापार व शेती करत होते. हे म्हणणे खरे नाही की, वादी आर्थिकदृष्टया सक्षम असल्याने त्यांनी माझ्याकडे पैश्याची मागणी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीला तु निपुत्रिक आहेस असा आरोप केला होता. वादीने मला मारहाण केल्याबाबत मी कोणतीही पोलीस तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सन १९६२ पासुन वादीपासुन विभक्त राहत आहे.

प्रश्न - तुम्ही सन १९६२ पासुन वादीपासुन विभक्त राहत आहे तर १९७० साली तुम्हाला वादीपासुन मुल झाले हे कसे शक्य आहे ?

उत्तर - त्यांनी मला घरातुन हाकलुन दिले होते.

१८. मी आजपर्यंत म्हणजेच ६४ वर्ष वादीपासुन विभक्त राहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.०५/०५/१९६५ साली बैठकीसाठी वादी व आमचे नातेवाईक आमच्या घरी आले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर बैठकीमध्ये मी वादीला सोडचिठ्ठी देण्याची मागणी केली. हे म्हणणे खरे नाही की, दि.०५/०५/१९६५ साली माझ्यामध्ये व वादीमध्ये तोंडी सोडचिठ्ठी झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, वादीने दुसरे लग्न केले. वादीला दुस-या पत्नीपासुन मुले झाली किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीमध्ये शारीरीक दोष आहे. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयाच्या आदेशान्वये वादीचे, माझे व मुली प्रतिवादी क्र.२ व ३ यांचे रक्ताचे नमुने डी.एन.ए. तपासणीकरीता घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, डी.एन.ए. चाचणीच्या अहवालानुसार प्रतिवादी क्र.२ व ३ या वादीच्या मुली नाहीत.

प्रश्न - न्यायालयाच्या आदेशान्वये दुस-यांदा रक्ताचे नमुने देण्यास सांगितले होते परंतु तुम्ही रक्ताचे नमुने देण्यास मुंबई येथे का गेले नाही ?

उत्तर - वादी आले नाही म्हणुन आम्ही मुंबई येथे गेलो नाही.

१९. हे म्हणणे खरे नाही की, दि.२६/०७/२०२१ रोजीच्या डी.एन.ए. चाचणीच्या अहवालानुसार प्रतिवादी क्र.२ व ३ या वादीच्या मुली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, मी २०१६ साली भुसंपादन विभागाकडे अर्ज केला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर अर्ज मी पैश्याची मागणी करण्याकरीता केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सन १९६२ पासुन माझा व वादीचा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी घोडेगाव न्यायालयात पोटगी मिळविण्यासाठी अर्ज केला होता. हे म्हणणे खरे आहे की, निवृत्ती आनंद बानखेले व बबन गोपाळराव बानखेले हे वादीचे शत्रु आहेत हे मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, बबन गोपाळराव बानखेले यांचे व माझ्या मुलींचे रक्ताचे नमुने घेतले तर ते जुळुन येतील. हे म्हणणे खरे नाही की, मी मुंबई येथे डि.एन.ए. चाचणी करण्याकरीता अर्ज केला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रामध्ये डी.एन.ए. चाचणीचा अहवाल खोटा आहे असे

लिहुन दिले आहे. मी डी.एन.ए. चाचणीचा अहवाल आव्हानीत करण्याकरीता कोणत्याही न्यायालयात अर्ज केला नाही. मी सदर अहवाल चुकीचा आहे तो ग्राह्य धरु नये अशा आशयाचा अर्ज किंवा प्रतिज्ञापत्र न्यायालयात दाखल केले नाही.

२०. दि.१५/०७/२०२१ रोजी मी रिजनल फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरी, गणेशखिंड, पुणे येथे कोणत्या समन्स अथवा नोटीसीने हजर झाले होते हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, जेव्हा डी.एन.ए. चाचणीकरीता रक्ताचे नमुने घेतले तेव्हा माझे जावई अशोक रोकडे हे तेथे हजर होते.

**मध्यांतर झाल्याने उलटतपास दुस-या सत्रापर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**

**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, घोडेगाव**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि.०२/०३/ २०२६**
**घोडेगाव**

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेते की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

**मध्यांतरानंतर पुढील उलटतपास शपथेवर सुरु.**

प्रश्न - तुम्ही सन १९६२ पासुन वादीपासुन विभक्त राहत आहे तर तुम्हाला १९७० साली संगिता नावाची मुलगी कोणापासुन झाली ?

उत्तर - जरी आम्ही विभक्त राहत असलो तरी, वादी माझ्या माहेरी ८ ते १० दिवस येऊन राहत होते.

२१. मुलींना शिकण्यासाठी पुण्याच्या शाळेत घातले. हे म्हणणे खरे नाही की, मुलींची अडचण होत होती म्हणुन मी त्यांना पुण्याच्या शाळेत शिकायला घातले. मुलींच्या लग्नामध्ये वादी उपस्थित नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दोन्ही मुलींचे कन्यादान वादीने केले

नाही. हे म्हणणे खरे नाही की, डी.एन.ए. चाचणीप्रमाणे वादी हे मुलींचे पिता नव्हते म्हणुन त्यांनी कन्यादान केले नाही. आमचे आनंदी व सुखी कुटूंब असुन देखील आम्ही एकत्र कुटूंबाचा फोटो पुराव्याकामी दाखल केला नाही. मी घोडेगाव न्यायालयामध्ये २००७ साली रे.मु.नं.२९/२००७ मध्ये त्रयस्थ इसमातर्फे अर्ज दाखल केला होता किंवा कसे हे मला आठवत नाही. सदर अर्ज आम्हाला कोणतेही कारण नाही म्हणुन निकाली काढला किंवा कसे हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी २०१६ साली राष्ट्रीय महामार्गामध्ये गेलेल्या जमिनीची नुकसान भरपाई मिळावी म्हणुन अर्ज केला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी सदरचा अर्ज वादीवर दबाव टाकण्यासाठी केला होता.

२२. हे म्हणणे खरे आहे की, दि.२६/०७/२०२१ रोजी माझ्या, माझ्या मुलींच्या व वादीच्या रक्ताच्या नमुनांचा आलेला अहवाल बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या मुली वादीच्या आहेत हे दाखविण्यासाठी त्यांच्या नावाच्या व्यतिरिक्त अन्य कोणताही पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी वादीवर दबाव टाकण्यासाठी व वादीकडून पैसे घेण्यासाठी वेगवेगळ्या न्यायालयात अर्ज केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीविरुध्द वाटपाचा खोटा दावा दाखल केला आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**

**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, घोडेगाव**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि.०२/०३/ २०२६**
**घोडेगाव**